# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

परिपत्रक क्र.४४

क्र.झोपुप्रा/उसंनर/आयडी कार्ड/२०००/२३३१
गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
दिनांक : २८ जुलै २०००.

**विषय : झोपडीधारकांना पुनर्वसनानंतर दिल्या जाणाऱ्या ओळखपत्रामध्ये फोटो असणेबाबत.**

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत सदनिका देतांना पात्र झोपडीधारकांस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत ओळखपत्र परिपत्रक क्र. एसआरए/डीडीटीपी/सरक्युलर/२२/ ९८, दि.२२.९.१९९८ अन्वये देण्यात येते. हे ओळखपत्र परिशिष्ट-२ च्या दाखल्यावरून तपासणी करून संगणीकृत करून देण्यात येते. मात्र त्यावर लाभार्थींचे फोटो लावले जात नाहीत. तरतूद क्र.१.९, परिशिष्ट-४, विकास नियंत्रक नियमावली क्र.३३(१०) अन्वये फोटोपास देणे आवश्यक असल्याने यामध्ये सुसुत्रता यावी म्हणून वरील दि.२२.९.१९९८ च्या परिपत्रकात खालीलप्रमाणे दुरूस्ती करण्यात येत आहे.

इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी बांधून तयार झालेल्या इमारतीमधील सदनिका वाटप करतांना परिशिष्ट-२ च्या यादीमधील कोणास वाटप करणार आहेत त्यांचे नांव, त्यांच्या नवऱ्याचे/बायकोचे नांव याबरोबरच उभयतांचे फोटो पण मागविण्यात यावा व त्यानंतरच भोगवटा प्रमाणपत्र देण्यात यावे. तद्नंतर फोटोसहीत ओळखपत्र योग्य त्या झोपडपट्टीधारकांना नियोजित सक्षम प्राधिकरणामार्फत देण्यात यावेत. संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

वरील परिपत्रक मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सही/
(सु.कें.जोशी)
उपसंचालक नगर रचना